**पशुपालक, क्षेत्रीय कर्मचारी ल्युपिन फाऊंडेशन, धुळे यांच्या करिता किफायतशीर शेळीपालन या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा कृषी विज्ञान केंद्र, धुळे येथे संपन्न....**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्र, धुळे, आत्मा, कार्यालय, धुळे व ल्युपिन फाऊंडेशन, धुळे यांचे माध्यमातून दि. ०६ फे. २०२४ रोजी पशुपालक यांच्या करिता व ०७ फे. २०२४ रोजी क्षेत्रीय कर्मचारी ल्युपिन फाऊंडेशन, धुळे यांच्या करिता असे दोन दिवसीय किफायतशीर शेळीपालन या विषयावरती डॉ.दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, यांचे अध्यक्षते खाली कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यशाळा प्रमुख उपस्थितीमद्धे श्री. कुर्बान तडावी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धुळे, डॉ. मिलिंद भंगे, उपायूक्त पशुसंवर्धन विभाग, धुळे, श्री.खुशावर्त पाटील प्रक्षेत्र समन्वयक,BCI,ल्युपिन फाऊंडेशन, धुळे, श्री. जगदीश कथेपुरी,शास्त्रज्ञ,कृषि विद्या,कृषी विज्ञान केंद्र, धुळे, डॉ धनराज चौधरी, शास्त्रज्ञ, पशु संवर्धन व दुग्ध शास्त्र, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, श्री. विनोद मसुले, श्री. तावडे श्री. तुषार संदाणे आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रशिक्षणाचे प्रास्ताविक डॉ.धनराज चौधरी यांनी केले, प्रास्तविका मध्ये त्यांनी प्रशिक्षणाचा उद्देश सांगत, कृषी बरोबर कृषी पूरक व्यवसाय यामध्ये शेळी पालनाचे महत्व सांगत कृषि विज्ञान केंद्र, शेतकरीभिमुख राबवित असलेल्या विविध उपक्रमविषयी माहिती दिली.

अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ.दिनेश नांद्रे यांनी शेळी पालनाची सध्यस्थिती व ग्रामीण अर्थव्यवस्थे मधील शेलीपालनाचे महत्व अधोरेखित करत उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच जास्तीत जास्त पशुपालाकांनी शेतकरी प्रशिक्षणा मध्ये सहभाग नोंदवत शेलीपालानातील शास्त्रीय बाबी तंत्रज्ञान समजून घेवून नियोजन करण्याचे आव्हान करत आपला आर्थिक स्तर उंचावला पाहिजे असे नमूद करत मार्गदर्शन केले. प्रमुख मार्गदर्शनात श्री. कुर्बान तडावी यांनी कृषि विभागाच्या विविध योजनविषयी माहिती देत मार्गदर्शन केले तर श्री.खुशावर्त पाटील यांनी BCI,ल्युपिन फाऊंडेशन शेतकरीभिमुख राबवित असलेल्या विविध उपक्रमविषयी माहिती देत मार्गदर्शन केले.

सदर दोन दिवसीय कार्यशाळे मध्ये डॉ. मिलिंद भंगे, सहायक उपायुक्त,पशुसंर्धन पशुसंर्धन विभाग, डॉ. धनराज चौधरी, यांचे मार्गदर्शन लाभले यात प्रामुख्याने भारतातील/महाराष्ट्रतील शेळयांच्या जाती व त्यांचे वैशिष्टे, शेळीपालनाच्या पद्धती, शेळयांच्या करडांचे संगोपन व आहारव्यवस्थापन इत्यादी, शेळयांचे निगा, आहार व्यवस्थापन, नर निगा, आहार व्यवस्थापन, पशु पैदास धोरण, शेळयांची निगा लसीकरण व रोग व्यवस्थापन, दुध व मांस खरेदी विक्री व्यवस्थापण, विविध शासकीय योजना माहिती, इत्यादी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.या प्रशिक्षणाचे संचालन डॉ.धनराज चौधरी यांनी केले. चर्चा सत्र यशस्विते साठी डॉ. पंकज पाटील, कु.अमृता राऊत, श्री. रोहित कडू, डॉ.आतिश पाटील,,कु.प्राची काळे,श्री.स्वप्नील महाजन, श्री.बाळू वाघ, श्री.कुमार भोये, श्री.रमेश शिंदे, श्री. कुणाल राजळे, श्री. जीवन राणे इ. कृषी विज्ञान केद्र धुळे अधिकारी,कर्मचारी तसेच BCI,ल्युपिन फाऊंडेशन, धुळे यांचे सहकार्य लाभले.